FORM-1A

पहिली खबर

0154200

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No ८९, वर्ष Year २०२२, दिनांक Date ०५/११/२२

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence Day ........, तारीख पासून Date from ३१/१०/२२, वेळ Time १४.३०, तारीख पर्यंत Date to ०४/११/२२, वेळ Time १६.२३
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ३१/१०/२२, वेळ Time १४.३० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोद क्र. General Diary Reference : Entry No. ०२/२०२३, तारीख Date ०५/११/२२ वेळ Time ०६.४५

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No.
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name श्री टी. बेकसमोर, ठिकाणाचे नंबर No. if any मुख्याट कार्यालय, गल्ली Ward जवळ, रस्त्याचे नाव Name of road सेनापती
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place बापट मार्ग, गाव Village माहीम, पोस्ट Post रेल्वे स्थानक जवळ, तालुका Taluka ........, जिल्हा Dist माहीम, राज्य State मुंबई.
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री विशाल बजाज
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name बलदेव बजाज
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३८ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ८८६०००१०९२
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address ........, गल्ली / सर्व्हे न. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. न. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ कार्ड नं Card No ........
   रस्त्याचे नाव Road लेक होम्स, जवळचे परिद्ध ठिकाण Nearest identifiable place लेक फ्लोरन्स, गाव Village फेज १, पोस्ट Post बी १००३, पो. स्टे. Stn पवई
   तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (सशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता याच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary)

श्री सतिश विश्वनाथ पोवार, वय ५६ वर्षे, कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशीत अधिकारी, बृहन्मुंबई महानगर पालिका, के/पूर्व वॉर्ड, विभाग, तेली गल्ली, गुंदवली अंधेरी (पु), मुंबई राहि - ८/८, नवजिवन कॉलनी, मोरी रोड, माहीम (प) मुंबई ४०००१६

Y.P.P.–800 Reg.–(25/3–150 Lks.)–2-2018–PA3–(K) 829

यातील फिर्यादी नामे श्री. निहाल बलदेव बजाज, वय ३८ वर्षे. यांचा आज दि. ०४/११/२०२२ रोजी स्वतंत्र पानावर मराठीतून संगणकावर टंकलिखित केलेला जबाब हाच नमुद गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

05/11/2022

(सुप्रिया नटे)

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

मुंबई

05/11/22

फिर्याद दिनांक – ०४/११/२०२२

श्री निहाल बलदेव बजाज वय ३९ वर्षे, धंदा–नोकरी, रा.ठि. लेक होम्स, लेक फ्लोरन्स, फेज–१, बी विंग, १००३, पवई, मुंबई–७६ मो.क्र. ८८६०००१७१२

.....

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझ्या कुटुंबियासमवेत २५ वर्षापासून राहावयास आहे. मी डिसी–२, केटू इंडस्ट्रियल इस्टेट, कोंडिविटा रोड, एमआयडीसी, मुंबई या कंपनीमध्ये ऑपरेशनल हेड या पदावर कार्यरत आहेत त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.

नमूद कंपनीमध्ये सर्व प्रकारच्या वाहनांना डेकोरेट व कस्टमाईज्ड केले जाते. सदरची कंपनी ही माझे मामा श्री दिलीप छाब्रीया यांच्या मालकीची असून कंपनीचे महत्वाचे कामकाज हे मी पाहत असतो. नमूद कंपनीच्या ऑफिस लगत असलेल्या अंदाजे ५००० चौ फूट परिसरामध्ये मागील ३० वर्षापासून शेड टाकलेली असून नमूद परिसराचा उपयोग कारचे इंटेरियर करण्याकरिता केला जातो. नमूद शेडचे बांधकाम हे अनधिकृत असलेबाबत दिनांक १३/१०/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व विभाग, अंधेरी पूर्व, मुंबई यांच्याकडून आमच्या कंपनीला नोटीस प्राप्त झाली होती. सदर नोटीसबाबत आमचे कंपनीकडून दि. १९/१०/२०२२ रोजी के/पूर्व मनपा या कार्यालयास वकिलामार्फतीने उत्तर सादर करण्यात आले होते.

त्यानंतर दि. २८/१०/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व, अंधेरी पूर्व विभागातील मनपा अधिकारी श्री ओमकार चव्हाण व कर्मचारी यांनी आमच्या कंपनीच्या परिसरामध्ये येवून नमुद शेड निष्कासित करण्यास सुरूवात केली. त्यावेळी मी ओमकार चव्हाण यांना सदरचे निष्कासन कारवाई थांबविण्याबाबत विनती केली असता, त्यांनी कार्यकारी अभियंता श्री सतिश पोवार, इमारत व कारखाने विभाग यांना संपर्क करण्यास सांगितले. त्यानंतर मी मनपा अधिकारी श्री सतिश पोवार यांना संपर्क केला असता, त्यांनी मला त्यांच्या कार्यालयात भेटावयास बोलाविले व त्यानंतर निष्कासन कारवाई थांबविली. त्याच दिवशी दि. २८/१०/२०२२ रोजी मी व माझे सहकारी श्री स्वप्नील घोलप असे आम्ही बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, अंधेरी पूर्व, मुंबई येथे श्री सतिश पोवार यांना भेटावयास गेलो. त्यावेळी श्री पोवार साहेबांनी मला आमच्या कंपनीच्या नमुद शेडचे निष्कासन थांबविण्याकरिता व आमच्या डीसी कंपनीला प्राप्त नोटीसवर स्थगिती आणण्याकरिता रू ५०,००,०००/–(पन्नास लाख रूपये) इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली.

मला श्री सतिश पोवार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनाक ३१/१०/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, मुंबई येथे वरिष्ठांना भेटुन इंग्रजीमध्ये लेखी तक्रार अर्ज दिला. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पंच हजर झाल्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सदर ठिकाणी हजर असलेले सपोआ आबासाहेब पाटील, दोन सरकारी पंच व पोलीस पथक यांची ओळख करून दिली.

त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी त्याच्या ताब्यातील मी दिलेला तक्रार अर्ज पंचाना वाचावयास दिला. सदर तक्रार अर्जातील मजकूर वाचून त्याबाबत पंचानी तक्रारदार यांना विचारून खात्री केली. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांच्या सुचनेवरून दोनही पंचांनी मी दिलेल्या तक्रार अर्जावर सह्या केल्या. पो.नि. सुप्रिया नटे यांनी समक्ष म्हणुन सही करून सदर तक्रार अर्ज स्वतःच्या ताब्यात घेतला.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०१/११/२०२२ रोजी पोनि नटे यांच्या सुचनेनुसार मी लाप्रवि, मुंबई विभाग येथे हजर झालो. त्यानंतर सदर वेळी पोनि नटे यांनी मला लोकसेवक यांनी केलेल्या मागणीसदर्भात पडताळणी करणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे

श्री निहाल बलदेव बजाज वय ३९ वर्षे यांचा दिनांक ०४/११/२०२२ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु

डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

पोनि नटे यांच्या सुचनेनुसार लोकसेवक श्री सतिश पोवार हे कार्यालयात हजर असल्याची खात्री करण्याकरिता मी माझे मोबाईल क्र. ८८६०००१७१२ वरून लोकसेवक श्री पोवार यांच्या मोबाईल क्र. ९८९२५५६४९२ वर सकाळी १०.५३ वा. व्हॉटसअप कॉल केला असता, लोकसेवक श्री पोवार यांनी त्यांचे वरिष्ठांकडे असल्याचे सांगून दहा मिनीटांनी कॉल करतो असे सांगितले. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

लोकसेवक श्री पोवार यांचा बराच वेळ कॉल न आल्यामुळे मी सकाळी ११.४१ वा त्यांचे मोबाईलवर पुन्हा व्हॉटसअप कॉल केला असता, ते काही कामात व्यस्त असून ते मोकळे झाल्यावर मला कळवतील असे त्यांनी सांगितले. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

त्यानंतर काही वेळाने लोकसेवक श्री पोवार यांचा मला सकाळी ११.५५ वा व्हॉटसअप कॉल आला असता, मी त्यांना कामानिमित्त मुंबईमध्ये असल्याचे सांगितले असता, त्यांनी मला ते एक वाजेपर्यत कार्यालयात येत असल्याचे माहिती दिली व त्यांच्या कार्यालयात मला भेटावयास बोलाविले. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

त्यानंतर मी लोकसेवक श्री पोवार यांना दुपारी १२.४२ वा माझे काम झालेबाबत व्हॉट्सअप कॉल केला असता, त्यांनी त्यांच्या कार्यालयात येण्याबाबत सांगितले. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी पडताळणी कारवाईकरिता कोणासही संशय येवू नये म्हणून माझे खाजगी वाहन क्र. एमएच ०२ बीवाय १८२२ मधून सपोआ आबासाहेब पाटील, पोनि नटे, पंच क्र १ श्री केदार, पंच क्र २ श्री पुंडकर असे तसेच पोनि सुप्रिया नटे यांनी मपोशि ०७–१३६३/शिगवण व पोना ०६१५६२/सोनोने हे टॅक्सीने माझ्या खाजगी वाहनाच्या पाठोपाठ येतील असे सांगितले.

त्यानंतर आम्ही सदर वाहनातून जात असताना लोकसेवक श्री पोवार यांचा दुपारी १३.१० वाजता व्हॉट्सअप कॉल आला त्यावेळी त्यांनी कार्यालयात येण्याबाबत किती वेळ लागेल याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना अर्धा तास लागेल असे सांगितले. त्यानंतर आम्ही लल्लुभाई मार्ग सिग्नल जवळ, अंधेरी पश्चिम येथे रस्त्याच्या बाजूला गाडी उभी केली. त्यावेळी पोनि नटे यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून टी शर्टच्या आतील बाजूस लावला. त्यानंतर मी व पंच क्र. १ केदार असे आम्ही लोकसेवक यांच्या कार्यालयात त्यांना भेटण्यासाठी गेलो.

मी लोकसेवक श्री पोवार यांना भेटण्याकरीता त्यांचे केबीनमध्ये गेलो असता, मी त्यांना एक किंवा दोन दिवस वाढवुन मागितले असता लोकसेवक यांनी दोन दिवसांचा कालावधी मला दिला. तसेच लोकसेवक यांनी मला ' लेकिन...ऐसा कोई आपको गाईड नही कर रहा है ना कोर्ट मे जस्ट चले जाओ....' असे म्हणुन प्राप्त नोटीसीसंदर्भात कोर्टमध्ये जाण्याचा सल्ला दिला नाही ना अशी विचारणा केली. तसेच ' वो इंटिमेंशन आने के बाद फिर मै थोडासा बॅकफुट पे चला जाऊंगा ना...तो मै तुरंत जे सी बी नही लगा सकता...' असे बोलले. सदरवेळी मी लोकसेवक यांनी मागणी केलेली रक्कम कमी करण्यास सांगितले असता त्यांनी **' नही नही...दस लाख लेके आओ...पेपर बनाने मे और...अपना कोर्ट का वकील का भी मै खुद अरेंज करुंगा...आपको कुछ नही देखना है..'** तसेच **' दो पाच लाख रुपया...तो उसमे दस लाख रुपया जानेवाला है.'** असे म्हणुन कोर्टाचा सर्व खर्च ते करणार असुन त्याकरीता त्यांना १० लाख रूपये खर्च होणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना

समक्ष

'चालीस तक तो किजिये सर...' अशी विनवणी केली असता त्यानी ' **तो चालीस ही मिल रहा है मेरे को...आप ये दोनो जबाबदारी आप लेते हो तो मेरे को चालीस दे दो...आपसे नही होयेगा वो.....'** असे म्हणुन त्याना कोर्टाचा खर्च जावुन चाळीस लाखच मिळणार आहेत त्यामुळे ती जबाबदारी मला घेण्यास सांगितली व कोर्टाचे कामाकरीताचे १० लाख रूपये व त्यांचे स्वतःकरीता ४० लाख रूपये अशी एकुण पन्नास लाख रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना '**ठिक है...तो चार तारीख को मै...आपको फोन कर देता हुं...आप मेरे को बता दिजिये किधर मिलना है मै उधर आ जाऊंगा...**' असे म्हणुन विचारणा केली असता त्यानी सहमती दर्शविली.

त्यानंतर मी व पंच क्र. १ केदार असे आम्ही पोलीस पथक असलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोनि नटे यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर सदरची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. त्यावेळी मला पोनि नटे यांनी दि. ०४/११/२०२२ रोजी लोकसेवक यांस दयावयाच्या लाचेची रक्कम रू. ५०,००,०००/– इतकी सापळा कारवाईकरिता तयार ठेवण्याच्या सुचना दिल्या. सदर बाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला.

दिनांक ०४/११/२०२२ रोजी मला पोनि नटे यांनी आमचे कंपनीतील कार्यालयात सकाळी ९.०० वाजता हजर राहणेबाबत मोबाईलवर सुचना दिल्या. त्यानुसार मी सकाळी ०९.३० वा. आमचे कार्यालयात हजर झालो. त्यानंतर काही वेळात सपोआ आबासाहेब पाटील, पोनि नटे, पंच क्र. १ श्री केदार, पंच क्र. २ श्री पुडकर व पोलीस पथक असे आमचे कार्यालयात हजर झाले. त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी मला पुन्हा एकदा सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो नि. सुप्रिया नटे व दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी मला तसेच पंच क्र १ व २, तसेच सापळा पथकातील सर्व लोकांना सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या.

दरम्यान दिनांक ०१/११/२०२२ रोजी ठरल्याप्रमाणे आज दिनांक ०४/११/२०२२ रोजी श्री सतीश पोवार यांना कोठे व केव्हा भेटावयाचे याबाबत विचारणा करणेकरीता पोनि सुप्रिया नटे यांचे सुचनेनुसार मी लोकसेवक पोवार यांना सकाळी ११.४३ व्हॉटसअप कॉल केला असता, लोकसेवक पोवार यानी मला ते कामानिमित्त बाहेर असल्याचे सांगून दुपारी ३.०० वा. मला फोन करण्यास सांगितले. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे. त्यानंतर काही वेळातच लोकसेवक श्री पोवार यांचा मला सकाळी ११.४८ वा व्हॉटसअप कॉल आला व त्यांनी मला एकटयाला भेटावयास बोलाविले.

त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे मामा श्री दिलीप छाब्रीया यांचे बचत खात्यामधुन काढलेली रोख रक्कम रू. ८,००,०००/–(आठ लाख रूपये ) पोनि नटे यांच्याकडे दिली. त्यावेळेस त्यांनी सदर नोटांचे माझ्या कार्यालयात असलेल्या प्रिंटरद्वारे झेरॉक्स काढल्या. त्यानतर पोनि नटे यांनी त्यांचेकडील अ‍ॅन्थ्रासिन पावडर दाखवून मला, दोन पंच व इतर सापळा पथकातील कर्मचारी याना अ‍ॅन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देवून सापळा कारवाईबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर सापळा पथकातील पोशि ०८००५०/परब यांनी मी दिलेल्या ८,००,०००/– रकमेला तसेच पोनि नटे यांनी हजर केलेल्या ४२,००,०००/– रूपयाच्या खेळण्यातील नोटांना अ‍ॅन्थ्रासिन पावडर लावून सदरच्या नोटा फिक्कट हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यात ठेवून सदरचा लिफाफा हा माझ्याकडील काळया रेक्झीन बॅगेत ठेवल्या

त्यानंतर लोकसेवक श्री पोवार यांचा मला फोन न आल्याने त्यांनी सांगितल्याप्रमाणे दुपारी ०३.२३ वा. च्या दरम्यान लोकसेवक श्री पोवार यांना व्हॉटसअप कॉल केला असता, त्यांनी मला माहिम पश्चिम स्टेशनच्या बाहेर बांद्राच्या दिशेने जाणाऱ्या सेनापती बापट मार्गावर भेटावयास बोलाविले. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर

श्री निहाल बलदेव बजाज वय ३९ वर्षे यांचा दिनांक ०४/११/२०२२ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु..

ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे. त्यानंतर दुपारी ३.२३ वा च्या दरम्यान लोकसेवक श्री पोवार यांनी मला माझे मोबाईलवर व्हॉटसअप कॉल करून " वो पेपर पुरे है ना..." अशी विचारणा केली.

त्यानंतर मी, दोन पंच व सापळा पथक माझे अंधेरी येथील कार्यालयातून वेगवेगळया खाजगी वाहनाने माहिमच्या दिशेने जाण्यास निघाले. कलानगर, बांद्रा पूर्व येथे आल्यानंतर पोनि नटे यांनी मला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून टि शर्टच्या आतील बाजूस लावला. त्यानंतर मी व पंच क्र. १ केदार असे माझे खाजगी वाहनाने माहिम स्टेशनच्या बाहेर आलो त्यावेळी सापळा अधिकारी व कर्मचारी असे आजूबाजूला कोणालाही संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहिले. त्यानंतर मी लोकसेवक श्री पोवार यांना फोन केला असता, त्यांनी मला यु टर्न घेवून माहिम स्टेशनच्या समोर बांद्रयाच्या दिशेन जाणाऱ्या रोडवर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी त्यांना व्हॉट्सअप कॉल करून मुथूट फायनान्स समोर असल्याचे सांगितले असता, त्यांनी मला पाच मिनिटात येतो असल्याचे सांगितले.

काही वेळातच लोकसेवक श्री पोवार हे एका चारचाकी वाहनातून माझ्या गाडीच्या पाठीमागे आले. सदरचे वाहन उभे करून उतरून ते माझे खाजगी वाहनात माझ्यासोबत पाठीमागील सीटवर येवून बसले. त्यावेळी मी "**पच्चास...पच्चास लाख जो आपने बोला है सर**..." असे सांगितले. त्यानंतर मी माझे रेक्झीनच्या बॅगमधील लिफाफ्यामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम त्यांना दिली. त्यानंतर लोकसेवक पोवार यांनी मला "**ठिक है...फिर मै जाऊ...**" असे सांगून रक्कम घेवून माझे गाडीतून उतरून मागील बाजूस असलेल्या त्यांच्या वाहनाच्या दिशेने निघाले असता, सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लोकसेवक श्री पोवार यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले.

लोकसेवक श्री. सतिश विश्वनाथ पोवार, कार्यकारी अभियंता (इमारत व कारखाने) बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी पूर्व, मुंबई यांनी आमचे डिसी–२, केटू इंडस्ट्रियल इस्टेट, कोंडिविटा रोड, एमआयडीसी, मुंबई या कंपनीच्या परिसरात असलेले शेडचे बांधकाम अनधिकृत असल्याची नोटीस देवून निष्कासन कारवाई थांबविण्याकरिता रू. ५०,००,०००/– रूपये लाचेची मागणी करून ती दि. ०४/११/२०२२ रोजी माझेकडून स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, लोकसेवक श्री. सतिश विश्वनाथ पोवार यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचून हिंदीतून समजावून सांगितली असता, ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page. रोख रक्कम ५०,००,०००/- त्यामध्ये रु. २०००/- च्या २०५ भारतीय चलनी नोटा, रु. ५००/- च्या ५०० चलनी नोटा, रु. २०००/- दराच्या खेळण्यातील २१०० नोटा.

10. (a) चोरीस गेलेल्या / अतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved ५०,००,०००/- (पन्नास लाख रुपये)

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ............ —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील बाजूस नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र. ७ मधील आलोसे यांनी फिर्यादी हे काम करीत असलेल्या DC2 या कंपनीच्या परिसरात असलेले शेड अनाधिकृत असल्याबाबत त्यांना दि. १३/१०/२२ रोजी मनपा के/पुर्व, अंधेरी, मुंबई येथून प्राप्त नोटीसच्या अनुषंगाने करण्यात येणारी निष्कासन कारवाई थांबविण्याकरीता दि. ०१/११/२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान फिर्यादी यांचेकडे रु. ५०,००,०००/- इतक्या लाचेची मागणी करून दि. ०४/११/२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान सदरची रक्कम लाच म्हणून स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून त्यांचे विरुद्ध कलम ७ भ्र.प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

सुप्रिया नटे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............ District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

05/11/2022

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सुप्रिया नटे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I.O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख. ............

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report